Peer Reviewed

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.7 • Issue 3 • 15 April. - 14 July 2022 • Rs.100/-

*International Interdisciplinary Multilingual Research Journal*




Editor
Dr.Kailas G.Kaninde

IMPACT FACTS VOL- 7 ISSUE- 3 15 APRIL - 14 JULY 2022 ISSN 2454-8332

# छत्रपती शिवाजी महाराज यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन:- एक अध्ययन

**प्रा डॉ वसंत कदम**
पदवी व पदव्युत्तर
इतिहास विभाग प्रमख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड

छत्रपती शिवरायांच्या शौर्यांचे पोवाडे रचणारे व गाणारे हजारो लेखक, शाहीर महाराष्ट्रात होऊन गेले. छत्रपती शिवरायवर आज पर्यंत प्रचंड प्रमाणात संशोधने, व्याख्याने व लेखन झाले, कथा कादंबरी नाटककारांनी देखील महाराजांच्या कार्य कर्तुत्वावर विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती केली, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र हा खरा तर मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील महाकाव्याचा विषय आहे. यावरून असे लक्षात येते की छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे राज्य शाहित लोककल्याणाची सतत तळमळ करणारे या भूतलावरील एकमेव राजे होते, म्हणून या राज्यच्या लोकशाही शासनव्यवस्थेत देखील छत्रपती शिवरायांची पावलोपावली आठवण येते. जगाच्या पाठीवर असा एक महान राजा होऊन गेला की त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांनी चालू केलेली लोककल्याणकारी शासन व्यवस्था अभ्यासली जाते,असा एकमेव युगपुरुष म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज.

सर्व धर्म समभाव निर्माण करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याची संकल्पना मध्ययुगीन कालखंडात पहिल्यांदा छत्रपती शिवरायांनी रुजविली ही एक प्रकारची सामाजिक क्रांतीच नव्हे तर त्यांनी तत्कालीन समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी उचललेले पहिले पाऊलच म्हणावे लागेल. प्रजेचे कल्याण हेच राज्यकर्त्याचे अंतिम ध्येय असले पाहिजे हे जाणणारा जाणता राजा छत्रपती शिवराय यांचा एक वैज्ञानिक दृष्टिकोन होता ते विज्ञानवादी होते असे ही त्यांच्यावरील अभ्यासातून स्पष्ट होते.

आज ज्ञान ,विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये समाज वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार करत आहे, मध्ययुगीन काळात वैज्ञानिक दृष्टिकोन ही संकल्पना सर्वसामान्य समाजापासून कोसो दूर होती. ज्या दृष्टीकोनात व्यक्तिनिष्ठतेपेक्षा वस्तुनिष्ठतेला महत्त्व दिले जाते, ग्रंथप्रामाण्यवादापेक्षा बुद्धिप्रामाण्यवादला अधिक महत्त्व दिले जाते ,ज्यामध्ये वस्तुनिष्ठता आणि चिकित्सा या गोष्टी महत्त्वाच्या असतात. पुरावा, परीक्षण, निरीक्षण आणि निष्कर्ष याशिवाय कशावरही विश्वास ठेवायचा नाही अशी दृष्टी वैज्ञानिक दृष्टिकोनात असते आज खऱ्या अर्थाने आपण वैज्ञानिक दृष्टीकोण या संकल्पनेचा विचार करतो त्या अर्थाने ही संकल्पना मध्ययुगीन काळात सर्वसामान्य समाजात रुजलेली नसेल पण आपण जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या त्यांच्या कार्याचा त्यांच्या धोरणांचा तसेच

त्यांच्या आज्ञापत्राचा चिकित्सकपणे विचार करायला लागतो तेव्हा त्यांची कार्य प्रणाली आणि त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या कसोटीवर तंतोतंत उतरणारे दिसतात.

विशेषतः महाराजांनी मुहूर्त, भविष्य व ज्योतिष यावर कधीही विश्वास ठेवला नाही, तर त्यांचा शौर्यावर व कष्टावर विश्वास होता, रायगडावर दिनांक 24 फेब्रुवारी 1670 रोजी छत्रपती शिवराय व सोयराबाई यांच्या पोटी राजाराम महाराजांचा जन्म झाला राजाराम महाराज हे पालथे जन्मल्यामुळे तत्कालीन ज्योतिषांनी , पुरोहितांनी अपशकुन सांगितला परंतु त्यांच्या सांगण्याला महाराजांनी तिळमात्रही दाद दिली नाही आणि ते त्वेषाने उद्गागारले "बहुत उत्तम आता ते दिल्लीची पातशाहीपालथी घालतील" छत्रपती शिवरायांनी घेतलेली ही भूमिका म्हणजेच त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणावा लागेल, त्याचबरोबर छत्रपती शिवरायांना साक्षात भवानीमातेने तलवार दिली हा एक सर्वसामान्य समाजात समज आहे. वास्तविक पाहता कोकणातील सावंतान कडून पोर्तुगीज बनावटीच्या उत्तम बनावटीच्या तलवारी महाराजांनी खरेदी केल्या होत्या त्यातील एक तलवार जिजाऊसाहेबांनी खास राजासाठी नक्षीकाम करून तयार करून घेतली आणि हीच तलवार एका समारंभात शिवरायांचे औक्षण करून देण्यात आली त्यापूर्वी माँ जिजाऊ व महाराजांनी प्रतापगडावर भवानी मातेचे दर्शन घेतले तलवारीचे ही पूजन करून ती तलवार देवीला अर्पण करण्यात आली आणि ती तलवार उचलून जिजाऊनी शिवरायांना दिली त्या तलवारीचे नाव भवानी असे ठेवण्यात आले. विशेषतः महाराज आपल्या मावळ्यांना नेहमीच सांगायचे की आम्हास दृष्टांत झाला साक्षात आई तुळजाभवानी माझ्या स्वप्नात आल्या आणि त्यांनी शिवबा विजय तुमचाच आहे असे सांगितले, महाराज मानसशात्रात पारंगत होते, याचा मानसिक प्रभाव सैन्यावर पडतो व त्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते म्हणून शिवरायांनी केवळ मावळ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांच्यात स्फूर्ती निर्माण करण्यासाठी त्यांना दिलेले वैचारिक रासायन म्हणजेच भवानी तलवार होय. ही तलवार सध्या इंग्लंडमधील बँकिंग हॅम पॅलेसच्या रॉयल कनेक्शन मध्ये आहे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री डॉक्टर अब्दुल रहमान अंतुले यांनी शिवरायांची भवानी तलवार परत मिळविण्यासाठी प्रयत्न केला परंतु त्यांना यश आले नाही.

भारतीय संस्कृती आणि समाजावर सर्वाधिक प्रभाव वैदिक साहित्याचा आणि संस्कृती चा आहे याच साहित्यात उत्तर वैदिक कालखंडापासून भारतीयांना समुद्र ओलांडण्यास बंदी घातली होती समुद्र ओलांडला तर वंश संपतो व महापातक लागते अशा प्रकारची अंधश्रद्धा भारतीयांच्या मनात रुजविली होती छत्रपती शिवाजी महाराजांनी मात्र काळाची पावले ओळखून अंधश्रद्धेला मूठमाती देऊन सिंधुदुर्गाचे काम चालू करत असताना समुद्रमार्गे बसनूरवर स्वारी केली व बसनूर बंदर ताब्यात घेतले तसेच स्वराज्याच्या रक्षणासाठी समुद्रातच अनेक जलदुर्ग निर्माण केले आणि समुद्रावर पहिल्यांदा आरमार उभे केले यावरून शिवरायांच्या दूरदृष्टी बरोबरच त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनही आपल्या लक्षात येतो.

**धर्म व वैज्ञानिकता:-**

वैज्ञानिक दृष्टिकोनात धर्माला गौण स्थान आहे विज्ञानानुसार सर्व मानव हे समान मानव प्राणी आहेत. परंतु प्राचीन कालखंडापासून भारतीय संस्कृती चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारलेली होती, हिंदू धर्म सोडून गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश करणे हिंदू धर्मियांनी निषिद्ध मानले होते,परंतु मध्ययुगीन काळात छत्रपती शिवरायांनी धर्ममार्तंड व परंपरेला मूठमाती देऊन हिंदू धर्मात पुनर्र प्रवेशाचा मार्ग खुला केला, असे धाडस भारताच्या इतिहासात दाखवणारा केवळ एकच राजा आढळतो तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्याचा सेनापती नेताजी पालकर यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास बादशहा औरंगजेबाने भाग पाडले होते, नेताजी हे कुलीखान नाव धारण करून मुसलमानांच्या पदरी नोकरी करीत होते जून 1676 मध्ये नेताजी उर्फ कुलीखान मोगलांच्या पेडगाव येथील छावणीतून निसटले आणि थेट साताऱ्याला येऊन त्यांनी शिवरायांची भेट घेतली. कुलीखान उर्फ नेताजी राजांना म्हणाले राज... मी तुम्हाला सोडून जगू शकणार नाही, मी तुम्हाला सोडून दूर जाणार नाही मृत्यू आला तर बेहतर ..राजे मला जवळ घ्या राज मला आपल्या छायेत, धर्मात घ्या त्यावर राजे म्हणाले "नेताजी तू माझा आहेस मी तुला दूर करणार नाही" याभुलोकी सर्व माणसे समान आहेत धर्म,जाती, पंथ, वर्णभेद हे माणसांनी निर्माण केलेले आहेत, आपण सर्वजण समान आहोत असे बोलून तत्कालीन समाजाची मानसिकता लक्षात घेऊन राजांनी त्यांचे शुद्धीकरण करून परत हिंदू धर्मात घेतले. सनातनी, परंपरावादी प्रवृत्तीच्या लोकांनी यावेळी शिवरायांना विरोध केला, तेव्हा राजे म्हणाले आपल्या लोकांना जवळ घेणे हाच खरा धर्म आहे आणि त्यांना दूर लोटणे जवळ न करणे हा अधर्म आहे. यावरून राज्यांनी ग्रंथप्रामाण्यवादला झुगारून देऊन बुद्धिप्रामाण्यवादाला स्विकारले, केवळ नेताजींचेच धर्म परिवर्तन करून थांबले नाहीत तर बजाजी निंबाळकराला आदिलशाहीचा सरदार अफजलखानाने जबरदस्तीने मुसलमान बनविले होते त्यावेळी शिवरायांनी त्यांना हिंदू धर्मात परत घेतले एवढे करून थांबले नाहीत तर त्यांच्यां मुलाला आपली मुलगी सखुबाई दिली व विवाह लावून दिला, असे धाडस आजच्या विज्ञान युगातही कोणी करू शकणार नाही ते राजांनी करून दाखवले,एवढेच नाही तर बाजी देशपांडे यांचा पुत्र पिलाजी ह्यांना देखील जबरदस्तीने मुसलमान बनविले होते त्यांचेही शुद्धीकरण करून शिवाजीराजांनी त्यास पुन्हा हिंदू धर्मात घेतले तसेच रामाजीनर्सी देशकुलकर्णी यांचा मुलगा श्यामजी देशकुलकर्णी यांनाही त्यांनी परत हिंदू धर्मात विधिवत घेतले. सर्व मानव प्राणी समान आहेत प्रत्येक जण त्याच्या मर्जीप्रमाणे आणि इच्छेप्रमाणे कोणत्याही धर्मात प्रवेश करू शकतो यालाच तर सामाजिक क्रांती व स्वातंत्र्य आणि समता म्हणता येईल, त्याच बरोबर छत्रपती शिवरायांचा वैज्ञानिक दृष्टीकोन काळाच्याही किती तरी पुढे होता यावरून आपल्या लक्षात येते.

छत्रपती शिवाजी महाराज सुरतेवरील स्वारी आटोपून परतीच्या मार्गावर होते वाटेतच त्यांना त्याचे आबासाहेब शहाजी राजांच्या मृत्युची बातमी समजली राजे तातडीने राजगडावर आले मॉंसाहेब

जिजाऊ ना भेटले निःश्वास सोडला आणि शिवरायांना दुःख अनावर झाले, जिजाऊंनी त्यांना सावरले त्यांची समजूत घातली "राजाला रक्ताची नाती विसरून रयतेशी नाती जोडावे लागतात आणि राज्य असं करावं लागते" याची जाणीव करून दिली, विज्ञानात नात्या गोत्या पेक्षाही रक्तगट महत्त्वाचा असतो शिवरायांनी त्याच पद्धतीने नाते संबंध विसरून जीवाला जीव लावणाऱ्या रयतेशी नाते जोडले होते.

सारांश रुपाने वरील सर्व घटनांचा चिकित्सकपणे अभ्यास केल्यानंतर छत्रपती शिवरायांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आपल्या लक्षात येतो.

**संदर्भ सूची :-**

1) डॉ. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र , पुणे राजहंस प्रकाशन, ऑगस्ट 1993.

2) कोकाटे श्रीमंत शिवाजी., विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, जिजाई प्रकाशन,, फेब्रुवारी 2001.

3) प्रा.जाधव अर्जुन., रयतेचा राजा शिवाजी, (मध्ययुगीन भारताचे तेजस्वी नेतृत्व), लातूर ,मुक्तरंग प्रकाशन ,फेब्रुवारी 2012

4) कुरुंदकर नरहर.,छत्रपती शिवाजी महाराज जीवन - रहस्य, पुणे,देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, नववी आवृत्ती 2021.

5) डॉ. धाये राजेंद्र, व डॉ मुटकुळे रामभाऊ., छत्रपती शिवाजी आणि शिवकाळ, लातूर, अरुण प्रकाशन, जानेवारी 2021.

6) प्रा. देशमुख मा.म., शिवराज्य, नागपूर, शिव भारती प्रकाशन, ऑगस्ट 2017.

7) डॉ. पवार जयसिंगराव., शिवछत्रपती एक मागोवा, कोल्हापूर, मेहता पब्लिशिंग हाऊस ,एप्रिल 2005.

8) डॉ. कोंडेकर आर.एस., मराठ्यांचा इतिहास, लातूर, अरुणा प्रकाशन, जून 2014.

9) प्रा. ओतुरकर रा वी., शिवाजी महाराजांच्या पत्रातून करणारे शिवाजी महाराज, पुणे, सनय प्रकाशन, मे 2021.

10) प्रा. जाधव नामदेवराव., शिवराय छत्रपती चा वैज्ञानिक, आर्थिक, प्रशासकीय खरा इतिहास, पुणे, रश्मी एंटरप्राइजेस, जानेवारी 2010.